# कामगार न्यायालय, लातूर

नगर पालिका शाळा क्र.६, खोरी गल्ली, लातूर

Email I.D. : labourcourt_latur@yahoo.com, Ph.No. : ०२३८२ – २४६२०८


---

जा.क्र. : कान्याला/७१२/२०२३ दिनांक – २२/१२/२०२३

## जाहिर नोटीस

## लिलावाव्दारे जुन्या झेरॉक्स मशिनची विक्री

**औद्योगिक न्यायालय, लातूर येथील सन २०११ सालची झेरॉक्स मशिन मॉडेल** (Kyosera Zerox Machine Model No.FS-1135 MFP Serial No.NVT2201263) **जाहीर लिलावाव्दारे खालील अटी व शर्तीवर विक्री करावयाची आहे.**

**अटी व शर्ती –**

**१.** झेरॉक्स मशिन विक्रीबाबतचा जाहिर लिलाव हा दि.१२/०२/२०२४ रोजी कामगार न्यायालय, लातूर नगर पालिका शाळा क्र.६, खोरी गल्ली, लातूर येथे होईल.

२. झेरॉक्स मशिन आहे त्या स्थितीत आहे त्या स्वरुपात विक्री करावयाची आहे. विक्री केल्यानंतर कसल्याही प्रकारचा दावा किंवा वाद ऐकुन घेतला जाणार नाही.

३. झेरॉक्स मशिनची पाहणी करण्यासाठी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत लिलावाच्या दिनांकापूर्वी पर्यंत कामकाजाच्या दिवशी उपलब्ध राहील. या कार्यालयाचे सहाय्यक प्रबंधक, न्यायालय लिपिक, वरीष्ठ लिपिक किंवा लिपिक टंकलेखक हे सदरचे झेरॉक्स मशिन दाखवतील.

४. झेरॉक्स मशिन खरेदी करणाऱ्या व्यक्तींनी त्यांच्या आधारकार्डची छायांकित प्रत अथवा इतर ओळखपत्रांची छायांकित प्रत या कार्यालयास सादर करावी लागेल.

५. एकदा विक्री केलेली झेरॉक्स मशिन ही कुठल्याही परिस्थितीत परत घेतली जाणार नाही.

६. झेरॉक्स मशिनचे निर्धारीत मुल्य ही कमीत कमी रु.१३,४९२/- ऐवढी आहे. लिलावादरम्यान रु.१३,४९२/- पेक्षा सर्वात जास्त बोली बोलणाऱ्या व्यक्तीस सदरची झेरॉक्स मशिन विकली जाईल.

७. झेरॉक्स मशिन खरेदी करणाऱ्या व्यक्तींनी लिलावापुर्वी रोख अनामत रक्कम रु.२५००/- जमा करणे आवश्यक आहे.

८. लिलावाव्दारे झेरॉक्स मशिन विकत घेणाऱ्या व्यक्तीस लिलावाची संपूर्ण रक्कम रोखीने २४ तासाच्या आत या कार्यालयात जमा करावी लागेल.

९. झेरॉक्स मशिन खरेदी करणाऱ्या व्यक्तींस झेरॉक्स मशिन ताब्यात दिल्यापासून तीन दिवसांच्या आत (सुट्टयासहीत) मशीन स्व:खर्चाने या कार्यालयातून घेऊन जावी लागेल.

१०. झेरॉक्स मशिन जी व्यक्तीं खरेदी करेल त्याव्यतिरिक्त इतर व्यक्तींची अनामत रक्कम त्वरीत परत केली जाईल तसेच झेरॉक्स मशिन खरेदी करणाऱ्या व्यक्तींची अनामत रक्कम झेरॉक्स मशिन घेऊन जातांना परत केली जाईल. आठ दिवसाच्या आत झेरॉक्स मशिन घेऊन न गेल्यास झेरॉक्स मशिन खरेदी करणाऱ्या व्यक्तींशी अनामत रक्कम जप्त केली जाऊ शकते.

११. लिलावादरम्यान बोली स्विकारणे अथवा नाकारणे तसेच कोणतेही कारण नमुद न करता अटी व शर्ती मध्ये बदल किंवा दुरुस्ती करणे इत्यादी सर्व अधिकार विक्री समिती राखुन ठेवत आहे.

१२. झेरॉक्स मशिन विक्री संर्दर्भातील या कार्यालयाच्या निर्णय हा अंतिम व झेरॉक्स मशिन खरेदी करु इच्छिणाऱ्या व्यक्तीवर बंधनकारक राहील.

**सही/-**
**न्यायाधीश,**
**कामगार न्यायालय, लातूर**